जा.क्र. म.सं.कें/प्रअपां/ प्लॅ. पिशवी / 9८७८ / 261 /२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
दि. 22/6/2022 24 JUN 2022

प्रति,
प्रती भागीलप्रमाणे

विषय : प्लॅस्टीक पिशवी पुरवठ्याचे दरपत्रक पुरविण्याबाबत....

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत असलेल्या पांगारी या विभागास खाली नमूद केल्यानुसार प्लॅस्टीक पिशवी ६"x८", १८"x१८" व १०"x१२" आकाराच्या खरेदी करावयाच्या आहेत. तरी या बाबतचे आपले बंद लखोटयातील दरपत्रक या कार्यालयास पाठविणेत यावे. आवश्यक प्लॅस्टीक पिशवी पुरवठयाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | आवश्यक अंदाजे प्रमाण किलो |
|---|---|---|
| | प्लॅस्टीक पिशवी (काळया रंगाची)३00 गेज छीद्रांसहीत आणि विद्यापीठाचे नावाचे छपाईसह अल्ट्राव्हायलेट स्टॅबीलायजर व्हर्जिन मटेरिएल | |
| १) | प्लॅस्टीक पिशवी ६" x ८" | ३०० किलो. |
| २) | प्लॅस्टीक पिशवी १८"x१८" | ६० किलो. |
| ३) | प्लॅस्टीक पिशवी १०"x१२" | २० किलो. |

अटी व शर्ती

१. बंद लखोट्यातील दरपत्रके दि. ११.०७.२०२२ पर्यंत मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली कार्यालयात पोहोच होणे आवश्यक आहेत तदनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. बंद लखोट्यावर प्लॅस्टीक पिशवी पूरवठ्याचे दरपत्रक असा उल्लेख करणे आवश्यक आहे.पिशवी नमुना जोडणे आवश्यक आहे.
३. विहीत मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. १२.०७.२०२२ रोजी या कार्यालयात दरपत्रक उघडण्यात येतील.
४. टपाल खात्याचे विलंबास,हे कार्यालय जबाबदार असणार नाही.
५. दरपत्रकामध्ये पूरवठादाराने GST क्र दृनमुद करणे आवश्यक आहे.
६. GST क्र. लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्र.असलेले पूरवठादाराचे लेटरहेडवरील दरपत्रक आवश्यक, सोबत PAN Card प्रत जोडणे आवश्यक.
७. अधिकृत विक्रेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे, तसेच संबंधित कंपनीची अधिकृत दर सूची जोडावी.
८. दरपत्रकामध्ये सर्व करांचा उल्लेख असणे आवश्यक.
९. साहित्य या केंद्राच्या प्रक्षेत्रावर पोहोच करणे बंधनकारक आहे.
१०. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरूस्ती करण्याचा किंवा नियत तारीख वाढवण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.
११. एक अथवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार त्यांचेकडे राखून ठेवीत आहेत.

आपला विश्वासू,

प्रभारी अधिकारी,
पांगारी विभाग
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी

File no 27 plastic bag kharedi